सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृतीबाबत १ वर्ष अभ्यासाअंती प्राप्त निविदा, अभिप्राय, सुचना व अडचणी विचारात घेऊन दि.१२/४/२०१७ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने एकत्रित सुधारित सूचना

---

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र क्र ०८/इमा-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७/०९/२०१८

वाचा : (१) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दिनांक १२ एप्रिल, २०१७

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दिनांक २९ जून, २०१७

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक : सीएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दिनांक २७ जुलै, २०१७

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०१७/सीआर-१२१ (भाग-२)/इमा-२, दिनांक १९ सप्टेंबर, २०१७

(५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक : संकीर्ण-२०१७/सीआर-१२१ (भाग-२)/इमा-२, दिनांक २३ सप्टेंबर, २०१७

(६) सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१७/सीआर-१२१ (भाग-२)/इमा-२ दिनांक ४ सप्टेंबर, २०१८

(७) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीएटी-२०१८/प्र.क्र.१८/इमा-२, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८

(८) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा२, दिनांक २४ मे, २०१८

प्रस्तावना:-

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये रस्ते, पूल बांधकाम, परिरक्षण व दुरुस्ती तसेच इमारती बांधकाम परिरक्षण व दुरुस्तीच्या अनुषंगाने विविध प्रकारच्या निविदा मागविताना व सक्षम स्तरावर स्विकृती करुन काम करण्याबाबत विविध सूचना यापूर्वी शासनाने निर्गमित केलेल्या आहेत. या सर्व सूचना निरनिराळ्या शासन निर्णयाद्वारे यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्या असल्यातरी देखील शासनाकडे प्राप्त होणाऱ्या निविदेमधील छाननी व तद्नुषंगाने प्रधान सचिव तसेच अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये निविदांच्या तपासणीमध्ये उद्भवलेल्या अडचणी विचारात घेऊन संपूर्ण प्रक्रियेचा एकात्मिक विचार करुन जुन्या सर्व सूचना अधिक्रमित करुन निविदा विषयक कामकाजासाठी नव्याने सुधारित सूचना निर्गमित करणे क्रमप्राप्त ठरले आहे. या अनुषंगाने या सर्व प्रकरणी शासन स्तरावरही सखोल अभ्यासाअंती या सर्व बाबींचा सर्वंकष अभ्यास करुन खालील बाबींवर एकत्रित सूचना या शासन निर्णयाद्वारे प्रसृत करण्यात येत आहेत :-

Scanned with CamScanner

(१) सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक मंजूरी प्रदान करणे व निविदा सूचना प्रसिध्द करणेपर्यंत कालावधी निश्चित करणे.

(२) ई निविदा प्रसिध्दी

(३) ई निविदा प्रसिध्दी कालावधी

(४) ई निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही

(५) ई निविदा उघडतांना निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही

(६) ई निविदा स्विकृती

रस्ते, पूल व इमारतींची नवीन बांधकामे, व्यवस्थापन, नियोजन, संकलन, दुरुस्ती, अन्वेषण यासाठी नियुक्त करावयाच्या सल्लागारांच्या निविदा विषयक आदेश या निर्णयात अंतर्भूत नाहीत. त्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

शासनाची विविध कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शीघ्रगतीने व्हावी यासाठी यापूर्वीपासूनच रु.३.०० लक्ष रकमेवरील कामांकरीता दि.२६/११/२०१४ पासून ई निविदेचा अवलंब करण्यात येत आहे. याबाबत वर संदर्भात नमूद केलेले शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करुन उपरोक्त मुद्यांबावत खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. **सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदेच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयीन बाबींची कार्यपध्दती -**

| क्षेत्रिय स्तरावरील कार्यलयीन बाबींची कार्यपध्दती (कमाल कालावधी दिवस) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | | क्षेत्रिय स्तरावर कार्यवाहीच्या बाबी | स्तर व कालावधी | | | | शेरा |
| | | | उपविभाग | विभाग | मंडळ | प्रादेशिक विभाग | |
| १ | | प्रादेशिक स्तरावर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे | ७ | ३ | २ | ५ | वरील मर्यादेत मंडळ अथवा प्रादेशिक स्तरावर धारिका अंतिम करणे आवश्यक राहील. |
| २ | | शासन स्तरावरील प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यासाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे | १५ | ३ | २ | ५ | |



Scanned with CamScanner

क्षेत्रिय स्तरावरील कार्यलयीन बाबींची कार्यपध्दती (कमाल कालावधी दिवस)

| अ.क्र. | | क्षेत्रिय स्तरावर कार्यवाहीच्या बाबी | स्तर व कालावधी | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उपविभाग | विभाग | मंडळ | प्रादेशिक विभाग | |
| ३ | | योजनांतर्गत/योजनेतर कामास प्रशासकीय मान्यता/जॉब क्रमांक प्राप्त झाल्यानंतर सविस्तर नकाशे व दरपत्रक तयार करण्याचा कालावधी (सर्वेक्षण, पाया तपासणी, चाचणी करणे इत्यादी) सर्व बाबी समाविष्ट करुन सविस्तर नकाशावर आधारीत सविस्तर अंदाजपत्रक | | | | | एका शाखा अभियंत्याकडे किमान ५० कि.मी. लांबी देखभाल व दुरुस्तीसाठी गृहित धरुन ५ अंदाजपत्रके ७ दिवसात तयार करणे आवश्यक आहे. |
| | i) | रस्त्यांची अंदाजपत्रके | ७ | १ | १ | १ | |
| | | अ) देखभाल व दुरुस्ती AMC | ७ | १ | १ | १ | |
| | | ब) मजबुतीकरण व डांबरीकरण | १५ | १ | १ | १ | |
| | | क) नूतनीकरण | ७ | १ | १ | १ | |
| | | ड) नाविन्यपूर्ण कामे | १५ | २ | २ | २ | |
| | ii) | पूलांची अंदाजपत्रके | १५ | १ | १ | १ | संकल्पचित्र मंडळाकडून GAD प्राप्त झाल्यानंतर |
| | | अ) ६० मीटर पर्यंतचे छोटे पूल | १५ | १ | १ | १ | |
| | | ब) ६० मी. ते २५० मी. लांबीचे पूल | १५ | ३ | ३ | २ | संकल्पचित्र मंडळाकडून GAD प्राप्त झाल्यानंतर |
| | | क) २५० मी. ते ५०० मी. लांबीचे पुल | २५ | ३ | ३ | २ | संकल्पचित्र मंडळाकडून GAD प्राप्त झाल्यानंतर |
| | | ड) ५०० मी. पेक्षा जास्त लांबीचे पूल | ६० | ३ | ५ | २ | संकल्पचित्र मंडळाकडून GAD प्राप्त झाल्यानंतर |
| | | इ) पूलांची नाविण्यपूर्ण कामे | ३० | २ | १ | १ | संकल्पचित्र मंडळाकडून GAD प्राप्त झाल्यानंतर |
| | | ई) पूल दुरुस्ती | १५ | १ | १ | १ | |
| | | फ) तंत्र/तांत्रिक सल्लागार सेल | ७ | १ | १ | १ | |
| | iii) | इमारतीचे अंदाजपत्रके | | | | | |
| | | अ) (१०० चौ.मी.) पर्यंत | १० | ३ | ३ | २ | |
| | | ब) (१०० चौ.मी. ते ५००० चौ.मी) | १५ | ३ | ३ | ३ | |



Scanned with CamScanner

| क्षेत्रिय स्तरावरील कार्यलयीन बाबींची कार्यपध्दती (कमाल कालावधी दिवस) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | | क्षेत्रिय स्तरावर कार्यवाहीच्या बाबी | स्तर व कालावधी | | | | शेरा |
| | | | उपविभाग | विभाग | मंडळ | प्रादेशिक विभाग | |
| | | क) (१५००० चौ.मी. पेक्षा जास्त व ५ मजल्यापेक्षा जास्त) | २५ | ३ | ५ | २ | |
| | | ड) इमारतीची दुरुस्ती | ७ | १ | १ | १ | |
| | | इ) इमारतीची नाविन्यपूर्ण कामे/ हेरिटेज कामे | १५ | १ | १ | १ | |
| | | ई) तज्ञ/ तांत्रिक सल्लागार सेल नियुक्तीची अंदाजपत्रके | ७ | १ | १ | १ | |
| | | फ) अन्य सेवा/ उपकरणे विषयक अंदाजपत्रके | ७ | १ | १ | १ | |
| ४ | | सविस्तर नकाशे व अंदाजपत्रक तपासणी तांत्रिक मंजूरी देणे (आवश्यक दुरुस्तीसह) | १ | २ | २ | २ | कामाची किंमत वाढवल्यास रस्ते लांबीचा वाव कमी करुन पूल व इमारती प्रकल्प नव्याने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे व नवीन प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक मान्यतेची कार्यवाही अपेक्षित आहे. |
| ५ | | तांत्रिक मंजूरी प्राप्त नकाशे व अंदाजपत्रकवर प्रारुप निविदा तयार करणे व त्यास मंजूरी देऊन निविदा प्रसिध्दीची कार्यवाही करणे. | १ | २ | २ | २ | |
| ६ | | प्रारुप निविदा मसूदा मजूरी मिळाल्यानंतर कामाच्या निविदा मागविणे | १ | १ | ० | ० | |
| ७ | | निविदा कालावधी | शासन परिपत्रक १२/०४/२०१७ प्रमाणे | | | | |
| ८ | | निविदा पूर्व बैठकीतील मुद्याचे निराकरण व CSD मंजूर करुन Upload करणे | ० | २ | २ | २ | |



Scanned with CamScanner

२. ई निविदा प्रसिध्दी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शासनाच्या विविध विभागांची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील रस्ते, पूल, इमारत व इतर अनुषंगिक बांधकामे व अस्तित्वात असलेल्या रस्ते, पूल व इमारतींची दुरुस्ती करण्यात येते. सध्याच्या पध्दतीमध्ये रु.३.०० लक्ष रकमेवरील कामे ई निविदा सूचना प्रसिध्द करुन, प्राप्त निविदेतील निम्नस्तर निविदाकारास/कंत्राटदारास त्याची ई निविदा स्विकृती करुन कार्यारंभ आदेश ई निविदेतील विहित मुदतीत कामे करण्याच्या अटींसह देण्यात येतो. या सर्व कामांच्या निविदा मागविण्यासाठी शासनाने यापूर्वी संदर्भाधीन शासन निर्णय / परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित केलेल्या आहेत. आता पूर्वीच्या सर्व सूचना अधिक्रमित करुन नव्याने खालीलप्रमाणे एकत्रित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१.१ रु.३.०० लक्षच्या आतील कामांसाठी वृत्तपत्रातून जाहिरात देऊन खरेदी करण्याची अथवा निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. अशा छोट्या कामांसाठी कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या नोटीस बोर्डवर निविदा सूचना मराठी व इंग्रजी भाषेतून प्रसिध्द करण्यात यावी व प्रथम सूचनेसाठी आठ दिवस व त्यास प्रतिसाद न मिळाल्यास द्वितीय सूचनेसाठी तीन दिवस एवढा कालावधी ठेवण्यात यावा. सामान्य प्रशासन विभागाच्या विहित मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ज्या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करावयाच्या आहेत, त्यांचा स्तर खालील तक्त्याप्रमाणे असावा :-

| अ.क्र. | कामाची किंमत | प्रसिध्दीचा स्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हा स्तर | राज्य स्तर | राष्ट्रीय स्तर |
| १. | रु. ३ लक्ष ते रु. ५० लक्ष | मराठी (१ वृत्तपत्र) | मराठी (१ वृत्तपत्र) इंग्रजी (१ वृत्तपत्र) | |
| २. | रु. ५० लक्ष ते २५ कोटी | मराठी (१ वृत्तपत्र) | मराठी (२ वृत्तपत्र) हिंदी (१ वृत्तपत्र) | इंग्रजी (२ वृत्तपत्र) हिंदी (१ वृत्तपत्र) |
| ३. | रु. २५ कोटी आणि त्यावरील | मराठी (२ वृत्तपत्रे) | मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (१ वृत्तपत्र) | इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे) |
| ४. | रु. १०० कोटी | मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) | मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे) | इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे) |



Scanned with CamScanner

टिप : ज्या जिल्ह्यातील काम आहे, त्या जिल्ह्यातील wide circulation (सर्वात जास्त प्रमाणात प्रसिध्द होणारी) असणाऱ्या महत्वाच्या वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करणे महासंचालक (प्रसिध्दी) यांना अनिवार्य राहिल. वृत्तपत्रात द्यावयाची जाहिरात ही प्रपत्र-१ मध्ये नमूद विहित नमून्यात असावी. यात कुठलाही बदल करण्यात येऊ नये. जाहिरातींची प्रसिध्दी तातडीने होणे आवश्यक असल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांनी उपसंचालक, (प्रसिध्दी)/संचालक/महासंचालक, माहिती संचालनालय यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून तीन दिवसांचे आत निविदा प्रसिध्द होतील असे पहावे. प्रसिध्दी संचालनालयाकडून याबाबत काही हरकत घेतल्यास त्याचे तात्काळ निराकरण करण्यासाठी सचिव (बांधकामे)/सचिव (रस्ते) आणि अथवा प्रधान सचिव (सा.बां.) यांचेशी तात्काळ संपर्क साधून सूचना प्रसिध्दीबाबत हयगय होणार नाही याकडे लक्ष द्यावे. निविदा सूचना प्रसिध्दी पत्रात प्रसिध्दी विभागाकडे पाठविल्यानंतर तीन दिवसाचे आत ई निविदा प्रसिध्द झाली नाही तर त्याची कारणे अभिलेखावर ठेवण्यात यावी. ज्या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द झाली आहे ते वृत्तपत्र संबंधित कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी निविदा धारिकेस जोडावे. निविदा प्रसिध्द झालेले संपूर्ण वृत्तपत्र (फक्त कात्रण नव्हे) निविदा धारिकेवर उपलब्ध झाले नाही तर निविदा स्विकृत करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी ही बाब धारिकेवर ठेवावी.

१.२ ई निविदा प्रसिध्दी यापूढे mahatenders.in या NIC च्या व शासनाने विशिष्ट आदेश दिल्यास योग्य त्या web portal वर प्रसिध्द कराव्यात. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कामांसाठी केंद्र शासनाच्या प्रसिध्दी निकषांचे अनुपालन करावे.

२. <u>ई निविदा प्रसिध्दीचा कालावधी</u>

२.१ निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे असावा :-

| अ.क्र. | कामाची किंमत | प्रथम वेळ | द्वितीय वेळ | तृतीय वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | रु. ३ लक्ष ते रु. ५० लक्ष | १५ दिवस | १० दिवस | ७ दिवस |
| २. | रु. ५० लक्ष ते रु.२५ कोटी | २५ दिवस | १५ दिवस | १० दिवस |
| ३. | रु. २५ कोटी ते १०० कोटी | २५ दिवस | २५ दिवस | १५ दिवस |
| ४. | रु. १०० कोटी आणि त्यावरील फिडीक/SBD | ४५ दिवस | ३० दिवस | १५ दिवस |

**टिपः- प्रस्तुतचे दिवस हे सुट्टीसह असल्याने कालावधीमध्ये कार्यालयीन दिवसांसह सुट्ट्या अंतर्भुत आहेत.**

१) निविदा प्रसिध्दीचा प्रथम प्रसिध्दी कालावधी काही कारणास्तव कमी करावयाचा झाल्यास तसा प्रस्ताव सा.बां.विभागाच्या मुख्य अभियंत्यांनी विषयानुरुप सचिव (रस्ते)/ सचिव (बांधकामे) यांचेकडे पाठवावा व पूर्वमान्यता घ्यावी. मात्र किमान कालावधी ७ दिवस इतका राहील.

२) अतिमहत्वाच्या जसे की हेलीपॅड, निवडणूक विषयक कामे, मा.राज्यपाल तसेच अन्य अति महत्वाच्या व्यक्तींच्या दौ-यासंदर्भात अन्य कामे व जनजाती क्षेत्रातील रु.१ कोटी पर्यंत कामांचा निविदा प्रसिध्दीचा कालावधी ३ दिवस इतका राहील.



Scanned with CamScanner

ब) तसेच ठेव व अंशदान योजनेसाठी (DEPOSIT) १००% अनामत रक्कम प्राप्त असेल तर भाववाढ व स्टार रेट चे कलम अंतर्भूत करु नये. ज्या कामासाठी मर्यादित तरतूद व भागशः अनुदान / ठेव अनामत रक्कम प्राप्त असेल अशा कामाच्या निविदेमध्ये सिमेंट, स्टील व डांबरासाठी स्टार रेट व भाववाढ कलम समाविष्ठ करावे.

३. <u>ई निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही</u>

३.१ यापूर्वी बऱ्याच नामांकित कंत्राटदारांकडून त्यांना निविदा उपलब्ध करुन देण्यात आल्या नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. आता ई-निविदा प्रणालीमध्ये लिखीत संकेत स्थळावरुन कोणताही कंत्राटदार कोठूनही निविदा संच प्राप्त करुन घेऊ शकेल(Download) व निविदा सादर करु शकेल (Upload). तथापि निविदेची विधीग्राह्यता निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहिल. आवश्यता असल्यास कंत्राटदाराकडून निविदा विधीग्राह्यता वाढवून घेण्यात यावी.

३.२ साधारणत: कार्यकारी अभियंता स्तरावर प्राप्त होणाऱ्या निविदांमध्ये निविदापूर्व बैठकीची तरतूद नसते. अशा ठिकाणी कार्यकारी अभियंता यांनी निविदा उघडण्यापूर्वी ज्या निविदाकारांनी/ कंत्राटदारांनी त्यांच्याकडे निविदा भरलेल्या आहेत, अशा सर्व कंत्राटदारांना निविदा उघडण्याच्या दिनांकाला अथवा लगेचच्या तीन दिवसात कार्यालयात विवक्षित वेळ देऊन बोलवावे. आतापर्यन्त पार पाडण्यात आलेली त्या निविदेसंबंधीची सर्व प्रक्रिया ही पारदर्शीपणे झालेली आहे आणि Bid lock दिनांकापर्यन्त पूर्ण झालेल्या ई निविदा प्रक्रियेसंदर्भात निविदा भरणाऱ्या संबंधीत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार नाही असे प्रमाणपत्र ताबडतोब प्राप्त करुन घ्यावे. असे प्रमाणपत्र देण्यास उपस्थित कंत्राटदारांनी नकार दिल्यास तेही अभिलीखीत करावे. संबंधीत कंत्राटदारांचा विरोध अनाठायी व नियमास अनुलक्षून नसेल तर तशी कारणे अभिलिखीत करावीत. जे कंत्राटदार अनुपस्थित राहिले असतील त्यांची अनुपस्थिती अभिलेखावर नमूद करावी. कार्यकारी अभियंत्यांनी संकेतस्थळामध्ये निविदा प्रक्रियेत अन्य कुठल्याही व्यक्ती अथवा System Integrator/ Service provider किंवा वेब साईट कोऑर्डिनेटरने कोणताही हस्तक्षेप केलेला नाही व या सर्व प्रक्रियेत सर्व संबंधितांनी सर्वतोपरी योग्य काळजी (due diligence) घेतलेली आहे असे अभिलेख्यावर नमूद करावे व नंतरच निविदा भरणाऱ्या जास्तीतजास्त कंत्राटदाराच्या उपस्थितीत निविदा उघडाव्यात.

४. <u>ई निविदा उघडतांना निविदा प्राधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही</u>

४.१ कंत्राटदार उपस्थित नसतांना निविदा उघडणे ही बाब संशय निर्माण करणारी व पारदर्शकतेला छेद देणारी असल्याने बहुसंख्य कंत्राटदारांच्या उपस्थितीत निविदा उघडणे अनिवार्य आहे. काही कारणाने बहुसंख्य कंत्राटदार उपस्थित रहात नसतील तर अशी निविदा उघडणे टाळावे. लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर त्यातील सर्व कागदपत्रांची छाननी करुन पात्र/अपात्र कंत्राटदाराविषयीचे सर्व निष्कर्ष, पात्र/अपात्रतेची सर्व कारणे सर्व संबंधित कंत्राटदारांना कळवावित व ही सर्व कारणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेत स्थळावर वर प्रसिध्द करण्यात यावी. अशी कारणे प्रसिध्द करण्याची सोय जर निविदा पोर्टल / Service provider च्या पोर्टलवर असेल तर तेथेही सर्व कारणे नमूद करावीत. विशेषत: ज्या कंत्राटदारांना अपात्र करण्यात आले आहे अशा सर्व कंत्राटदारांना त्यांच्या अपात्रतेची कारणे त्यांना स्पष्टपणे कळविण्यात यावीत.



Scanned with CamScanner

